| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | १०.०७.२०२० | |
| नोंदणी तारीख | १०.०७.२०२० | |
| निकाल तारीख | ०८.०५.२०२६ | |
| कालावधी | वर्ष महिना दिवस | |
| | ०५ ०९ २८ | |

मुख्य न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर यांचे न्यायालयात

(पीठासीन अधिकारी एम. एम. गादिया)

नियमित फौजदारी खटला क्र.१३५७/२०२०.

CNR No.MHKO030047102020. निशाणी क्र.३७/ब.

गुन्हा क्रमांक ४४६/२०१९.

महाराष्ट्र शासन तर्फे शाहूपुरी
पोलीस ठाणे, कोल्हापूर. .. अभियोग पक्ष

*विरुध्द*

१. **सौ. जिजाबाई पंडीत बनकर,**
वय : ५० वर्षे, धंदा : घरकाम,
रा. मस्के शॉप जवळ, कनाननगर,
कोल्हापूर.

२. **धनश्री धनाजी बनकर,**
वय : २८ वर्षे, धंदा : घरकाम,
रा. सदर.

३. **धनाजी पंडीत बनकर,**
वय : ३० वर्षे, धंदा : ड्रायव्हर,
**रा.** सदर.

.. आरोपी

.................................................................................................

| | | |
|---|---|---|
| अभियोगपक्षातर्फे सरकारी अभियोक्ता | – | श्री. ए. एन. डोईफोडे. |
| आरोपींतर्फे विधीज्ञ | – | श्री. एस. व्ही. कुंभार. |

.................................................................................................

## न्यायनिर्णय

( दिनांक ०८.०५.२०२६ )

आरोपींविरुध्द महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील कलम ३९, ४५ व भारतीय दंड विधान,१८६० मधील कलम ५०४, व ५०६ सह कलम ३४ खालील गुन्ह्यांसाठी दोषारोप ठेवण्यात आलेले आहे.

**०२.**अभियोगपक्षाची थोडक्यात हकिकत अशी की, दिनांक १५.०६.२०१६ रोजी फिर्यादीचे पती सरफराज नदाफ यांचा अपघात झाला होता, त्यामुळे फिर्यादीस तीचे पतीचे औषधोपचारासाठी पैशाची गरज होती. त्यामुळे फिर्यादीने आरोपी क्र.१ कडून सन २०१६ साली रुपये ५०,०००/– १० टक्के व्याजाने घेतले. फिर्यादी सदर कर्जाचे परतफेडीसाठी दर महिन्याला व्याज म्हणुन रुपये ५,०००/– व सात भिशीचे पैसे प्रत्येकी १,०००/– प्रमाणे प्रतिमहिना रुपये ७,०००/– अशी एकुण रक्कम रुपये १२,०००/– देत होती. अशाप्रकारे फिर्यादी व तीचे पतीने आरोपी क्र.१ हीला कर्जापोटी रक्कम रुपये १,८०,०००/– व भिशीचे रक्कम रुपये २,५२,०००/– दिले आहेत. आरोपी क्र.१ हीने भिशीची रक्कम रुपये २,५२,०००/– फिर्यादीस परत न देता परस्पर कपात करुन घेतली आहे. तरी देखील आरोपी हे फिर्यादी व तीच्या कुटूबियांकडे व्याजाच्या पैशाची मागणी करीत होते. फिर्यादी आरोपी क्र.१ हीला मुद्दल परत करतो, असे सांगत असताना देखील आरोपींनी फिर्यादीला किडणी विक, मुलग्याला भिक मागायला लाव, पैसे

व्याजासकट दिले नाही तर जिवे मारणार अशी धमकी दिली. तसेच आरोपींनी फिर्यादीकडे जुन–२०१६ ते दिनांक १५–०६–२०१७ पर्यंत घेतलेल्या रक्कमेचे व्याजासह रक्कम रुपये ७०,०००/– मागणीसाठी तगादा लावला होता. म्हणुन फिर्यादीने दिनांक २६.०७.२०१९ रोजी शाहूपुरी पोलीस ठाणेत फिर्याद दिली, व त्याप्रमाणे महाराष्ट्र सावकारी(नियमन) अधिनियम, २०१४ मधील कलम ३९, ४५ व भारतीय दंड विधान,१८६० मधील कलम ५०४, व ५०६ खालील गुन्हयासाठी गुन्हा क्रमांक ४४६/२०१९ अन्वये गुन्ह्याची नोंद होवून, तपासाअंती, त्यांच्याविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

**०३**.माझ्या विव्दान पुर्वाधिका–यांनी दोषारोप(नि.१७) तयार केला आहे. सदर दोषारोपातील सर्व मजकूर आरोपींना त्यांच्या मातृभाषेत वाचुन दाखवण्यात आला असता, त्यांनी गुन्हा नाकबुल करुन, चौकशी करण्याची विनंती केली. बचावपक्षाने अभियोगपक्षाची सर्व हकिकत नाकारली आहे, व आरोपींना वितुष्टातुन खोट्या गुन्ह्यात गोवण्यात आल्याचे नमूद केले आहे.

**०४**.वादप्रश्न व त्यावरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत,

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | आरोपी हे विनापरवाना सावकारकीचा व्यवसाय करतात, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **... नाही.** |
| २. | आरोपींनी अधिकृत परवान्याशिवाय सावकारीने दिलेले पैसे वसूल करण्यासाठी उपद्रव निर्माण केला, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **... नाही.** |

| | | |
|---|---|---|
| ३. | आरोपींनी संगनमताने फिर्यादीस प्रक्षोभीत करुन सार्वजनिक शांततेचा भंग होण्याच्या उद्देशाने तसेच इतर कोणताही अपराध घडावा, या उद्देशाने अपमान केला, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **... नाही.** |
| ४. | आरोपींनी संगनमताने फिर्यादीस फौजदारीपात्र धाकदपटशा दिला, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **... नाही.** |
| ५. | काय आदेश ? | **...आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले आहे.** |

## कारणमीमांसा

**०५.**दोन्ही बाजुंच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. आपल्या हकिकतीच्या पृष्ठर्थ, फिर्यादी व मिराबी(अ.सा.२) यांच्या सह्या (अनु. नि.२१ व २६) घेतल्या आहेत. अभियोगपक्षाने दिनांक २६.०७.२०१९ रोजीच्या फिर्यादचा (नि.२२) चा आधार घेतला आहे.

**वादप्रश्न क्र.१ ते ४ करिता,**

**०६.**सदर वादप्रश्न हे परस्परांशी निगडीत असल्यामुळे, सदर वादप्रश्नांचे विश्लेषण सोईसाठी एकत्रीतपणे करण्यात येत आहे. फिर्यादीने आपल्या साक्षीत(नि.२१) असे नमूद केले आहे की, सन २०१९ मध्ये तीच्या पतीचा कोल्हपूर येथील टोल नाक्यावर मोठा अपघात झालेला होता, व त्यामुळे तीस पैशाची नितांत आवश्यकता होती. म्हणून तीने आरोपी क्र.१ कडून रुपये ५०,०००/- १० टक्के व्याजाने घेतलेले होते. त्यानंतर ती आरोपी क्र.१ हीस भिशी व इतर उत्पन्नातुन दरमहा

रुपये ५,०००/– तसेच भिशीसाठी रुपये ७,०००/– देत असत. त्याप्रमाणे तीने आरोपी क्र.१ हीस रक्कम रुपये २,००,०००/– दिले आहेत. आरोपी क्र.२ ही आरोपी क्र.१ ची सुन आहे तर आरोपी क्र.३ हा तीचा मुलगा आहे. आरोपी क्र.२ व ३ हे तीस मुलाची किडणी विकुन किंवा सिग्लनवर भिक मागुन पैसे दे असे म्हणत असे. तीने आरोपींचे पैसे देणेसाठी घरातील सर्व पितळी वस्तु विकलेल्या आहेत. आरोपीने तीच्याकडून व्याजापोटी भरपुर रक्कम घेतलेली आहे.

**०७.**फिर्यादीच्या सरतपसात(नि.२१) कथीत आरोपी क्र.१ कडून व्याजाने पैसे घेतलेबाबतचा तारीख, ठिकाण, वेळ व स्थळ याबाबत काहीही तपशिल आलेला नाही, व तीने केवळ त्याबाबत सन २०१९ हे वर्ष नमूद केलेले आहे. फिर्यादीने आरोपी क्र.१ कडून रुपये ५०,०००/– व्याजाने घेतल्याबाबत तसेच व्याजापोटी तीस रुपये २,००,०००/– दिल्याबाबत शब्दांव्यतिरिक्त इतर कोणताही पुरावा दिलेला नाही. तीने फिर्यादीस रुपये २,००,०००/– व्याज कोणत्या तारखेस व कसे दिले, याचाही तपशील आपल्या साक्षीत दिलेला नाही. तीने पुढे असे मान्य केले आहे की, तीने आरोपी क्र.१ हीस ८ वर्षे व्याज दिल्याबाबत पोलिसांकडे कधीही तक्रार केलेली नव्हती, तसेच तीने त्याबाबत इतरांनाही सांगीतलेले नव्हते. तीने आरोपीस सदर रक्कम दिल्याबाबत तीच्याकडे कागदोपत्री पुरावा नाही.

**०८.**मिराबी(अ.सा.२) या फिर्यादीच्या आईने आपल्या सरतपासात(नि.२६) मोघमपणे असे नमूद केले आहे की, सन २०१९ मध्ये आरोपी क्र.१ ला १० टक्के व्याजाने पैसे ती पैसे देत होती. त्यानंतर तीच्याकडे पैसे नव्हते. दोन ते चार दिवस उशिर झाला की, आरोपी क्र.१ ही तीस धंदा कर असे सांगत असे. मुलाला धंद्याला लाव, भिक मागव किंवा काही करुन व्याज दे असे आरोपी क्र.१ तीस म्हणत असे. तीने आरोपींकडून रुपये ७०,०००/– घेतलेले होते व त्यावर तीने आठ वर्षे व्याज दिलेले आहे. आता तीच्याकडे पैसे नाहीत. आरोपीने तीच्यासोबत भांडण केले. आरोपी हे तीस घरी बोलावुन धमकी देत असत. सदर साक्षीदाराने

फिर्यादीने आरोपींकडून व्याजाने पैसे घेतलेले होते, असे काहीही नमूद केलेले नाही. तीने आपल्या साक्षीत आरोपी क्र.१ कडून व्याजाने पैसे घेतल्याचे मोघमपणे नमूद केले आहे. पण त्याबाबत स्पष्ट तारीख, वेळ व ठिकाणासह तपशिलवार कथन केलेले नाही. तीने आरोपी क्र.१ कडून व्याजाने रक्कम घेतल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा शाबीत करण्यात आलेला नाही. फिर्यादी व मिराबी यांच्या साक्षी या पुर्णपणे मोघम आहेत, तसेच त्यांच्या मौखीक साक्षीस कोणतीही कागदोपत्री पुष्टी नाही. सदर दोन्ही साक्षीदारांच्या साक्षीमध्ये आरोपींनी त्यांना दिलेल्या कथीत उपद्रव किंवा धमक्यांबाबत तारीख, वर्ष व ठिकाणासह स्पष्ट तपशिल आलेला नाही. सदर दोन्ही साक्षीदार हे हितसंबंधी साक्षीदार आहेत. सदर दोन्ही साक्षीदारांच्या साक्षीत आरोपी क्र.१ ही विनापरवाना सावकारकीचा व्यवसाय करते, असे काहीही आलेले नाही. त्याअनुषंगाने अभियोगपक्षाने इतर कोणत्याही साक्षीदाराची साक्ष घेतलेली नाही.

**०९.**एकंदरीतच आरोपी क्र.१ ही विनापरवाना सावकारी व्यवसाय करते, आरोपींनी आरोपींनी गैरपरवाना सावकारकीतुन दिलेल्या रक्कमेच्या वसुलीकरीता फिर्यादीस उपद्रव केला, तसेच तीस अपशब्द वापरुन धमकी देवुन धाकधपटशा दिला, हे योग्य संशयविरहीतपणे शाबीत झालेले नाही. परिणामतः आरोपींविरुध्दचा सावकारी अधिनियमातील ३९ व ४५ तसेच भारतीय दंड संहीतेमधील कलम ५०४, व ५०६ खालील गुन्हे योग्य संशयविरहीतपणे शाबीत झालेले नाहीत. म्हणुन वादप्रश्न क्र.१ ते ४ चे निष्कर्ष नकारार्थी असे आहेत.

**<u>वादप्रश्न क्र.५ बाबत</u> :-**

**१०.**मी वादप्रश्न क्र.१ ते ४ ला दिलेल्या नकारार्थी निष्कर्षांचा विचार करता, आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. परिणामतः वादप्रश्न क्र.५ च्या

नि.३७

निष्कर्षादाखल, मी खालील आदेश पारित करित आहे,

**<u>आदेश</u>**

१. आरोपींना महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील कलम ३९, ४५ व भारतीय दंड विधान,१८६० मधील कलम ५०४, व ५०६ खालील गुन्ह्यांतुन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम २४८(१) नुसार गुन्ह्यातून निर्दोष मुक्त करण्यात आले आहे.

२. आरोपींचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात आले, व त्यांना स्वातंत्र्य बहाल करण्यात आले आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MAHAVEER MOTICHAND GADIYA
Date: 2026.05.08 13:50:51 +0530

कोल्हापूर. **(एम. एम. गादिया)**

दिनांकः ०८.०५.२०२६. मुख्य न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर.

नि.३७

## सारांश

| | | |
|---|---|---|
| १. | गुन्हा घडलेली तारीख | १५.०६.२०१६ ते २५.०७.२०१९ |
| २. | प्रथम खबर | २६.०७.२०१९ |
| ३. | दोषारोप पत्र दाखल तारीख | १०.०७.२०२० |
| ४. | दोषारोप तारीख | १८.०४.२०२२ |
| ५. | पुरावा सुरु झालेची तारीख | २२.०९.२०२२ |
| ६. | कोणत्या तारखेला निकालासाठी ठेवले | -- |
| ७. | निकाल तारीख | ०८.०५.२०२६ |
| ८. | शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | नाही. |

## आरोपी विषयी माहिती

| अ. क्र. | आरोपींची नावे | अटक तारीख | जामीनावर सुटलेली तारीख | केलेले गुन्हे | निर्दोष किंवा शिक्षा | दिलेली शिक्षा | फौजदारी दंड संहितेच्या कलम ४२८ साठी खटल्यादरम्यान ताब्यात घेतलेला कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सौ. जिजाबाई पंडीत बनकर | --- | ०९.०२.२०२१ | महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील कलम ३९, ४५ व भारतीय दंड विधान,१८६० मधील कलम ५०४, व ५०६ | निर्दोष मुक्तता | .... | .... |

नि.३७

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २. | सौ. धनश्री धनाजी बनकर | ... | ०९.०२.२०२१ | ....''.... | निर्दोष मुक्तता | .... | .... |
| ३. | श्री.धनाजी पंडीत बनकर | ... | ०९.०२.२०२१ | ....''.... | निर्दोष मुक्तता | .... | .... |

**फिर्यादी/बचाव/ न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**(अ) – अभियोग पक्षातर्फे साक्षी यादी –**

| अ.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | शबाना सर्फराज नदाफ(अ.सा.१) | फिर्यादी(नि.२१) |
| २. | मिराबी कुरबानअली मकानदार (अ.सा.२) | साक्षीदार(नि.२६) |

(ब) – बचाव पक्षातर्फे साक्षीदार – निरंक

(क) – न्यायालया तर्फे साक्षीदार – निरंक

**फिर्यादी/बचाव/ न्यायालयीन निशाणी क्रमांक –**

(अ) – अभियोग पक्षातर्फे निशाणी –

| अ.क्र. | तपशिल | निशाणी |
|---|---|---|
| १. | फिर्याद | २२ |

(ब) – बचाव पक्षातर्फे निशाणी – निरंक

(क) – न्यायालयातर्फे निशाणी – निरंक

(ड) – भौतिक वस्तू – निरंक

Digitally signed by MAHAVEER MOTICHAND GADIYA
Date: 2026.05.08 13:50:56 +0530

कोल्हापूर. **(एम. एम. गादिया)**

दिनांकः ०८.०५.२०२६. मुख्य न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर.